Topic 4 सामाजिक समूह

Social Groups

A] सामाजिक समूहाची वैशिष्ट्ये आणि अर्थ
Meaning And characteristics of Social Groups

प्रस्तावना :-
सामाजिक समूह ही संकल्पना समाजशास्त्रामध्ये महत्त्वपूर्ण संकल्पना म्हणून ओळखली जाते. याचे कारण एका शारीरिक मानवप्राण्याचे रुपांतर सामाजिक मानवप्राण्यात समाजीकरणाच्या सहाय्याने केले जाते. हे समाजीकरण अनेक सामाजिक समूहांच्या माध्यमातून होत असते. त्याचबरोबर व्यक्तीला आपल्या गरजांची पूर्तता करण्यासाठी समूहाची मदत घ्यावीलागते म्हणजेच व्यक्ती समूहामध्ये राहणे हा त्याच्या जीवनाचा अविभाज्य भाग असतो. यासाठीच सामाजिक समूहांना महत्त्व प्राप्त झाले आहे " सामाजिक समूहांचा अभ्यास करणारे शास्त्र म्हणजे समाजशास्त्र" असे हेरी जॉन्सन यांनी म्हटले आहे.

आपण दैनंदिन व्यवहारात समूह हा शब्द अनेक अर्थाने वापरतो. उदा. घरांचा समूह, मित्रांचा समूह, पक्ष्यांचा समूह इ. कोणत्याही एकत्रित असलेल्या वस्तूंना आपण समूह असे समजत असतो तरी समाजशास्त्रामध्ये समूह या संकल्पनेचा अर्थ वेगळा आहे.

समाजशास्त्रीय दृष्टिने केवळ अनेक व्यक्ती एकत्रित आल्या म्हणजे समूह निर्माण होत नाही. तर त्यासाठी त्या व्यक्तींना परस्परांची जाणीव, आंतरक्रिया, विचारांचे आदान प्रदान घडून येणे आवश्यक असते. म्हणजेच समूह निर्माण होण्यासाठी एकत्रित येणाऱ्या व्यक्तींमध्ये स्थायी स्वरुपाचे संबंध निर्माण होणे आवश्यक आहे.

व्याख्या :- Definition

1] ऑगबर्न आणि निमकॉफ :-

"जेव्हा दोन किंवा त्यापेक्षा अधिक व्यक्ती एकत्रित येतात आणि परस्परांना प्रभावित करतात. तेव्हा त्या व्यक्तींचा मिळून सामाजिक समूह बनतो."

2] हेरी जॉन्सन :-

"सामाजिक समूह म्हणजे सामाजिक आंतरक्रियेची व्यवस्था होय."

3] हॉर्टन आणि हंट :-

"सदस्यत्वाची व आंतरक्रियांची जाणीव असणारे कितीही लोक म्हणजे सामाजिक समूह होय."

4] जॉन क्यूबर :-

"समूह म्हणजे पारंस्पारिक आदान-प्रदान करणाऱ्या व्यक्तींचा समुच्चय होय."

एखादया हेतूच्या किंवा उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी परस्परांच्या संपर्कात येणाऱ्या दोन किंवा अधिक व्यक्तींचा मिळून सामाजिक समूह निर्माण होतो. त्या व्यक्तींना परस्परांची जाणीव असते. त्या जाणीवेमुळे समान उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी ते आंतरक्रिया करतात. त्यामधूनच समूहाची निर्मिती होते. मानवी समाजात असंख्य प्रकारचे सामाजिक समूह दिसून येतात. उदा. कामगार संघटना राजकीय पक्ष, मित्रांचा समूह, कुटुंब इ.

## सामाजिक समूहाची वैशिष्ट्ये :- Characteristics of Social Groups.

सामाजिक समूहाच्या निर्मितीसाठी काही पूर्व अटी महत्त्वाच्या या अटींची पूर्तता झाली तरच सामाजिक समूहाची निर्मिती होते अशा पूर्व अटींनाच समूहाची वैशिष्ट्ये म्हणून ओळखले जाते. ती वैशिष्ट्ये

1] दोन किंवा दोनपेक्षा अधिक व्यक्ती :-

सामाजिक समूह अस्तित्वात येण्यासाठी किमान दोन व्यक्तींची गरज असते. केवळ एका व्यक्तीचा समूह निर्माण होत नाही. समूहाच्या निर्मितीसाठी आंतरक्रिया घडून येणे आवश्यक असते. अशा आंतरक्रियांसाठी किमान दोन व्यक्ती असाव्या लागतात. जास्तीत जास्त कितीही व्यक्ती असल्या तरी चालू शकतात. म्हणजेच किमान दोन व्यक्ती असणे ही समूह अस्तित्वात येण्याची पूर्व अट आहे. एखादया समूहातील सदस्य संख्येवर कोणतेही बंधन असत नाही. उदा. दोन मित्रांचा समूह ( या समूहामध्ये कमीत-कमी दोन व्यक्ती आहेत ) एखादा राजकीय पक्ष ( या समूहात लाखो व्यक्ती असू शकतात ) सदस्यांच्या या संख्येवरून समूहाचे लहान समूह आणि विशाल समूह असे दोन प्रकार पडतात.

2] सामाजिक आंतरक्रिया आणि त्याची जाणीव :-

समाजातील दोन किंवा त्यापेक्षा अधिक व्यक्ती एकत्रित आल्या त्यांच्यात भौतिक संपर्क असला परंतु त्यांच्यात आंतरक्रिया होत नसतील तर त्यास समूह म्हणता येणार नाही. तो केवळ लोकांचा समुच्चय होय. उदा. रस्त्यावरील गर्दी.

अशा एकत्रित आलेल्या व्यक्तींमध्ये जर आंतरक्रिया होत असतील त्या आंतरक्रियांची त्यांना जाणीव असेल तेव्हाच खऱ्या अर्थाने सामाजिक समूह अस्तित्वात येतो. सामाजिक आंतरक्रियांमुळे लोकांचे वर्तन परस्परांना प्रभावित करत असल्याने समूहाची निर्मिती होते.

3] सदस्यांमधील सापेक्षतः टिकाऊ संपर्क :-

सदस्यांमध्ये निर्माण होणारे संबंध केवळ प्रासंगिक स्वरूपाचे असतील तर त्याला समूह म्हणता येणार नाही. उदा. प्रवासामध्ये आपले स्टेशन येईपर्यंत शेजारच्या प्रवाशांबरोबर आंतरक्रिया होऊन जो समूह निर्माण होतो तो तात्पुरत्या स्वरूपाच्या समूह ठरतो. प्रवास संपताच तो समूह नाहीसा होतो. असे संबंध समूहाच्या स्थिरतेच्या दृष्टिने महत्त्वाचे ठरत नाहीत. समूहातील सदस्यांमध्ये नेहमीच भौतिक

सानिध्य असावे असे पण नाही. समूहातील सदस्यांमधील सामाजिक संबंध स्थिर स्वरुपाचे असले पाहिजेत तरच दिर्घकाळ आंतरक्रिया घडून येतात. आंतरक्रियांचे प्रमाण अधिक असेल तर सामाजिक संबंध घनिष्ठ होतात. यासाठी समूहाच्या सदस्यांमध्ये टिकाऊ संपर्क व दिर्घकाळ आंतरक्रिया घडून आल्या पाहिजेत हे समूहाचे वैशिष्ट्य मानले जाते.

4] समान उद्दिष्ट्ये :-

समान हेतू किंवा उद्दिष्ट्ये हे सामाजिक समूहाचे लक्षण आहे. समूहामध्ये एकत्र येण्यासाठी अनेक व्यक्तींना कोणतातरी हेतू किंवा उद्दिष्ट असते. हा हेतू समूहातील सर्वांसाठी समान असतो. त्याच्या प्राप्तीसाठी व्यक्ती आंतरक्रिया करतात. उदा. कामगार संघटना ( पगारवाढ, बोनस काही सवलती या उद्दिष्टांसाठी संघटित होऊन प्रयत्न करतात. )

अनेक व्यक्ती एकत्रित आल्या म्हणजे समूह निर्माण होत नाही. एकत्रित आलेल्या व्यक्तींची उद्दिष्ट्ये जर समान असतील तरच त्याच्या पूर्ततेसाठी केल्या जाणाऱ्या आंतरक्रियेमधून समूहाची निर्मिती होते.

5] सहकार्य :-

सामाजिक समूहाची जी उद्दिष्ट्ये असतात ती उद्दिष्ट्ये प्राप्त करण्यासाठी सदस्यांनी परस्परांना सहकार्य केले तरच उद्दिष्ट प्राप्तीच्या दिशेने तो समूह वाटचाल करु शकतो. समूहामध्ये सहकार्याची भावना असल्याशिवाय उद्दिष्टे पूर्ण होऊ शकत नाहीत. सहकार्य हे प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष स्वरुपाचे असते. आपण इतरांना सहकार्य करत आहोत याची जाणीव नेहमीच असते असे नाही. समूहामध्ये मतभेद, स्पर्धा, संघर्ष या गोष्टीदेखील असतात. तरीदेखील सहकार्य हे महत्त्वाचे आहे. सहकार्याशिवाय व्यक्ती-व्यक्तीमधील संबंध स्थिर राहू शकत नाहीत.

Scanned with CamScanner

6] समूहाची रचना :-

प्रत्येक सामाजिक समूहाला स्वतःची अशी एक रचना असते. ही रचना त्या समूहातील दर्जा, भूमिका सामाजिक मूल्ये व प्रमाणके यापासून तयार होत असते. प्रत्येक समूहात प्रत्येक व्यक्तीला विशिष्ट स्थान असते. त्या स्थानानुसार किंवा दर्जानुसार व्यक्तीला आपले काम किंवा भूमिका पार पाडावी लागते. त्या भूमिकेचे निर्धारण सामाजिक नियमनांच्या सहाय्याने केले जाते.

उदा:- महाविद्यालय या समूहात प्राचार्य, प्राध्यापक, विद्यार्थी, लेखनिक किंवा लिपिक, शिपाई इ. भूमिका असतात. त्या भूमिका प्रत्येकाला नियमानुसार पार पाडाव्या लागतात. त्यामुळे तो समूह टिकून राहतो. यावरून प्रत्येक सामाजिक समूहाला रचना प्राप्त झालेली असते.

7] समूहाची गतिशीलता :-

सामाजिक समूह हे स्थायी स्वरूपाचे दिसतात परंतु समूहाच्या संदर्भात दिर्घकालावधीचा विचार केल्यास बदलत्या परिस्थितीनुसार सदस्यांचा दर्जा, भूमिका यामध्ये बदल होत असतो. म्हणजेच समूह हे गतिशील असतात. समूहाच्या स्वरूपात रचनेमध्ये आणि कार्यामध्ये परिवर्तन होत असते. हे जलद किंवा मंदगतीने होऊ शकते. मात्र प्रत्येक समूहात गतिशीलता दिसून येते.

8] स्वतंत्र अस्तित्व :-

सामाजिक समूहांना स्वतंत्र अस्तित्व असते. केवळ अनेक व्यक्तींच्या एकत्र येण्याने समूहाची निर्मिती होत नाही. तसेच समूहातील व्यक्ती भौतिकदृष्ट्या अलग असल्यातरी समूह नष्ट होत नाही. समूहातील व्यक्ती बदलतात. मात्र समूह स्थिर असतो. त्या समूहाची रचना स्थिर असल्याने प्रत्येक समूहाला स्वतंत्र अस्तित्व प्राप्त झाले आहे.

Scanned with CamScanner

9) आपलेपणाची भावना :-

सामाजिक समूहातील सदस्यांमध्ये आपलेपणाची सहकार्याची भावना दिसून येते. ही भावना आपल्या समूहाशी संबंधित असते. त्यामुळे समूहाची उद्दिष्ट्ये पूर्ण होतात. समूहामध्ये असणाऱ्या एकतेच्या भावनेवरुनच समूहाची स्थिरता निश्चित होते.

10] सदस्यांच्या वर्तनाचे नियंत्रण :-

समूहाची उद्दिष्ट्ये पार पाडण्यासाठी प्रत्येक व्यक्तीला विशिष्ट दर्जा प्राप्त होतो. आपल्या दर्जानुसार सदस्याला भूमिका पार पाडावी लागते.

उल्लंघन करणार नाही याची दक्षता समूहाकडून घेतली जाते म्हणजेच समूहातील सदस्यांच्या वर्तनावर नियंत्रण ठेवण्याचे कार्य समूहाकडून पार पाडले जाते.

11] प्रत्येक सामाजिक समूहाच्या निश्चित सीमारेषा असतात.

मानवप्राणी हा सामाजिक प्राणी असल्याने प्रत्येक व्यक्ति समूह, समुदाय आणि समाजामध्येच राहणे पसंत करते. सामाजिक समूहाच्या अभ्यासाला यामुळेच समाजशास्त्रामध्ये महत्त्व प्राप्त झाले आहे.

Scanned with CamScanner

Page No.
Date: / /

B] Bases of Classification of Social Groups

## सामाजिक समूहाच्या वर्गीकरणाचे निकष

प्रस्तावना :-

मानवी समाजात विविध प्रकारचे असंख्य सामाजिक समूह दिसून येतात. या सर्व सामाजिक समूहांमध्ये काही बाबतीत समानता, सारखेपणा असला तरी अनेक बाबतीत भेद, फरक दिसून येतात. समाजशास्त्रातील अभ्यासकांनी सामाजिक समूहामधील अशा भेदांना समूहाच्या वर्गीकरणाचे निकष किंवा आधार बनविले आहे. या निकषांच्या आधारे सामाजिक समूहांचे वर्गीकरण केले जाते. ते पुढीलप्रमाणे

1] समूहाचा आकार :- Size of Group

समूहातील सदस्यांच्या संख्येवरुन समूहाचा आकार ठरत असतो. समूहातील सदस्यांची संख्या कमी असल्यास त्या समूहाचा आकार लहान असेल आणि सदस्य संख्या जास्त असल्यास समूहाचा आकार मोठा ठरतो. जर्मन समाजशास्त्रज्ञ जॉर्ज सिमेल यांनी समूहाच्या आकारावरुन समूहाचे दोन प्रकार स्पष्ट केले आहेत ते पुढीलप्रमाणे :-

A] लहान किंवा लघु समूह :- Small Groups

ज्या समूहातील सदस्यसंख्या कमी असते त्या समूहास लहान समूह म्हणून ओळखले जाते. दोन व्यक्तींचा समूह हा सर्वात लहान समूह आहे. सदस्यसंख्या कमी असल्याने समूहाचा आकार लहान राहतो त्यामुळे अशा समूहातील संबंध घनिष्ट आणि आत्मीयतेचे असतात.
उदा. कुटुंब.

B] विशाल किंवा मोठा समूह :- Large Group

ज्या समूहातील सदस्यसंख्या अधिक असते. अशा समूहाला मोठे समूह म्हणून ओळखले जाते. सदस्यांच्या संख्येवर त्यांच्यातील संबंधांचे स्वरुप अवलंबून असते.
उदा. राष्ट्र, शाळा, सैन्यदल इ.

Scanned with CamScanner

समूहाचा आकार हा निकष ही अपेक्षा बाब आहे. जसा आकार वाढत जातो तसे समूहातील गुंतागुंतीचे स्वरूप वाढत जाते.

2] समूहाच्या सदस्यत्वाचे स्वरूप :- Nature of Membership

एखादया व्यक्तीला समूहाचे सदस्यत्व कसे प्राप्त होते या निकषाच्या आधारे लेस्टर वॉर्ड आणि गिडिंग्ज यांनी समूहाचे दोन प्रकारामध्ये वर्गीकरण केले आहे ते पुढीलप्रमाणे :-

A] ऐच्छिक समूह :- Voluntary Group

ज्या समूहाचे सदस्यत्व व्यक्तीच्या इच्छेवर अवलंबून असते. इच्छेनुसार त्याला समूहाचे सदस्य होता येते. त्यास 'ऐच्छिक समूह' असे म्हणतात. अशा समूहाचे सदस्य व्हायचे की नाही याचा निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य त्या व्यक्तीला असते.

उदा. नाट्यमंडळ, क्रिडामंडळ. इ.

B] अनिवार्य समूह :- Involuntary Group :-

ज्या समूहाचे सदस्यत्व व्यक्तीच्या इच्छेवर अवलंबून असत नाही त्याची इच्छा असो वा नसो व्यक्तीला समूहाचे सभासद व्हावे लागते. अशा समूहाला अनिवार्य समूह म्हटले जाते. या समूहाचे सदस्यत्व व्यक्तीला जन्मतःच प्राप्त होत असते.

3] हितसंबंधाची व्याप्ती किंवा विस्तार :- समूहातील सर्व सदस्यांना समान असणाऱ्या आपल्या हितसंबंधाच्या व्याप्तीच्या संदर्भात समूह समूहा-मध्ये फरक, भेद दिसून येतात. हितसंबंधांची व्याप्ती या निकषाच्या आधारे समूहाचे दोन प्रकारामध्ये वर्गीकरण केले जाते. ते पुढीलप्रमाणे :-

Scanned with CamScanner

A] विशिष्ट हितसंबंधी समूह :- Specific Interest Groups

काही समूहांचे हितसंबंध मर्यादित किंवा विशिष्ट स्वरूपाचे असतात. अशा समूहांना विशिष्ट हितसंबंधित समूह म्हणून ओळखले जाते. अशा समूहामधील सदस्य कोणत्यातरी विशिष्ट ठराविक हितसंबंधांच्या पूर्ततेसाठी एकत्र आलेले असतात. उदा. क्रिडामंडळ, नाट्यमंडळ, साहित्यमंडळ इ.

B] सर्वसमावेशक हितसंबंधी समूह :- All Inclusive Interest Group

काही समूहांची हितसंबंधांची व्याप्ती अत्यंत विशाल असते. साधारणपणे एकापेक्षा अधिक हितसंबंध अशा समूहात पूर्ण केले जात असतात. अनेक प्रकारच्या हितसंबंधांची जोपासना करणाऱ्या सामाजिक समूहांना सर्वसमावेशक हितसंबंधित समूह असे म्हटले जाते. उदा :- कुटुंब, ग्रामीण समुदाय इ.

4] हितसंबंधाचा कालावधी :- Duration Of Interest

मानवी समाजामध्ये विभिन्न प्रकारचे समूह दिसून येतात. त्यापैकी काही समूहांची निर्मिती तात्पुरत्या हितसंबंधाच्या पूर्ततेसाठी झालेली असते. तर काही समूह दिर्घकाळ टिकून राहतात. या हितसंबंधांच्या कालावधीवरुन चार्ल्स एलवुड यांनी दोन प्रकार विशद केले आहेत. ते पुढीलप्रमाणे :-

A] स्थायी समूह :- Permanant Groups

समाजातील काही समूहांनी उद्देश्ये पूर्ण करण्यासाठी दिर्घ कालावधीची गरज असते. अशा समूहातील सदस्य दिर्घकाळासाठी समूहामध्ये सहभागी झालेले असतात. असे समूह सदस्यांचे हितसंबंध गरजा इ.च्या पूर्ततेसाठी दिर्घकाळ हवे असतात. समाजाच्या गरजा पूर्ण करण्यासाठी अशा समूहांचे अस्तित्व आवश्यक असते. अशा समूहाला स्थायी समूह म्हणून ओळखले जाते.
उदा :- कुटुंब, धार्मिक समूह

Scanned with CamScanner

B] अस्थायी समूह :- Temperary Groups

जे समूह आपले विशिष्ट उद्दिष्ट साध्य करण्यासाठी निर्माण होतात. ते उद्दिष्ट पुर्ण झाले की तो समूह नष्ट होतो. अशा अल्प-काळाकरीता निर्माण झालेल्या समूहाला अस्थायी समूह म्हणून ओळखले जाते.
उदा :- एखादे शिष्टमंडळ, गर्दी.

5] संघटनाचे प्रमाण :- (Degree of Organization)

संघटन हे सामाजिक समूहासाठी आवश्यक असते. समूहांच्या संघटनांच्या प्रमाणात समूहा-समूहात भेद असतो. त्यामुळे समूहातील संघटनाच्या प्रमाणावर आधारित समूहाचे दोन प्रकारचे वर्गीकरण केले जाते ते पुढीलप्रमाणे :-

A] सापेक्षत: असंघटित समूह :- Relatively Unorganized Groups

ज्या समूहामध्ये कायमस्वरुपी संघटन किंवा रचनेचा अभाव असतो. ज्या समूहातील प्रमाणके, नियमने अस्पष्ट असतात अशासमूहांना सापेक्षत: असंघटित समूह म्हणून ओळखले जाते. अशा समूहाना औपचारिक रचना नसते. कायद्याच्या आधारे वर्तन नियंत्रित केले जात नाहीत. त्यामुळे त्यांना आपली उद्दिष्ट्ये साध्य करताना अनेक अडचणी येत. उदा :- दररोज सकाळी फिरण्यासाठी जाणारा पेन्शन-धारक लोकांचा समूह.

B] अधिक प्रमाणात संघटित समूह :- Highly Organized Groups

अशा समूहांना कायमस्वरुपी संघटनात्मक रचना प्राप्त झालेली असते. त्यांची रचना गुंतागुंतीची असते. असल्या कारणाने सदस्यांनी परस्परांशी कसे वागावे असे लिखित व अलिखित नियम असतात. प्रत्येक सदस्यांचे हक्क आणि कर्तव्य स्पष्ट केलेली असतात. यासमूहात अधिकार श्रेणी निर्माण झालेली असते. उदा :- कामगार संघटना, सेनादल इ.

Scanned with CamScanner

6] सदस्यांमधील परस्पर संबंधांचे स्वरुप :-
Nature Of Relationship Among Member

समूह आणि सदस्य यांच्यातील सामाजिक संबंध कोणत्या प्रकारचे आहेत. आपुलकीची भावना आहे. अथवा दुराव्याची भावना आहे. अशा परस्परसंबंधांवरुनच समूहाचे दोन प्रकारामध्ये वर्गीकरण केले जाते. ते पुढीलप्रमाणे :-

A] औपचारिक समूह :- Formal Groups

ज्या समूहातील सदस्यांचे परस्पर संबंध, लिखित नियम व कायदे या आधाराने नियंत्रित केलेले असतात. अशा समूहांना औपचारिक समूह म्हणून ओळखले जाते. अशा समूहामध्ये व्यक्तींचे स्थान, अधिकार, कर्तव्य याची स्पष्ट जाणीव करुन दिलेली असते उदा. नोकरशाही, कामगार संघटना.

B] अनौपचारिक समूह :- Informal Groups

ज्या समूहातील सदस्यातील परस्पर संबंध अनौपचारिक असतात, लिखित नियमनांनी ज्यांचे वर्तन नियंत्रित झालेले नसते. ज्या समूहांची रचना विस्कळीत असते. अशा समूहाना अनौपचारिक समूह म्हणून ओळखले जाते. या समूहातील सदस्यांमध्ये मुक्त व खेळीमेळीचे वातावरण दिसून येते.
उदा :- मित्रांचा समूह.

7] सदस्यांवर आधारित व्यक्तिनिष्ठ दृष्टिकोन :-
Membership Based Indivisual view / Point / Attitude

प्रत्येक व्यक्ती कोणत्यातरी समूहाची सदस्य असते. व्यक्ती ज्या समूहाची सदस्य असते. त्या समूहाविषयी व्यक्तीच्या मनात आपलेपणाची भावना असते. याउलट व्यक्ती ज्या समूहाची सदस्य असत नाही. त्या समूहाविषयी व्यक्तिच्या मनात परकेपणाची भावना असते. सदस्यांचा समूहाबद्दल असणारा व्यक्तिनिष्ठ दृष्टिकोन विचारात घेऊन

अमेरिकन समाजशास्त्रज्ञ विल्यम समनेर यांनी १९०६ मध्ये लिहिलेल्या Folkways या ग्रंथात समूहाचे दोन प्रकार स्पष्ट केले आहेत. ते पुढीलप्रमाणे :-

A] अंतर्समूह :- In Groups

व्यक्ती ज्या समूहाची सदस्य असते अशा समूहाबद्दल व्यक्तीच्या मनात आपलेपणा, अभिमानास्पद भावना असते. अशा समूहातील समान उद्दिष्ट्ये, सहकार्य यामुळे त्यांच्यात आपलेपणाचा विकास घडून येतो. परिणामी इतर समूहापेक्षा आपला समूह व्यक्तीला श्रेष्ठवाटतो व्यक्ती ज्या समूहाची सदस्य असते तो समूह तिच्या दृष्टीने अंतर्समूह ठरत असतो. उदा - कुटुंब आणि महाविद्यालय.

B] बहिर्समूह / बाह्यसमूह :- Out Groups

व्यक्ती ज्या समूहाची सदस्य नसते तो समूह व्यक्तीच्या दृष्टीने बहिर्समूह ठरत असतो. अशा समूहाबद्दल व्यक्तीच्या मनात आपलेपणाचि भावना नसते. दुसऱ्यांच्या समूहाबद्दल परकेपणाची भावना असते. उदा :- दुसऱ्याचे कुटुंब किंवा इतर महाविद्यालय इ.

8] संपर्काचे स्वरुप व सदस्यातील घनिष्ठता :- Nature of Contact and Intinacy Of Relationship

अमेरिकन समाजशास्त्रज्ञ सी. एच. कुले यांनी १९०९ मध्ये Social Organization (सामाजिक संघटन) या ग्रंथामध्ये सदस्यांच्यातल्या संपर्काचे स्वरुप आणि संबंधांची घनिष्टता या निकषावर आधारित प्राथमिक समूह ही संकल्पना स्पष्ट केली या निकषाच्या आधारेच समूहाचे दोन प्रकारात मध्ये वर्गीकरण केले जाते. ते पुढीलप्रमाणे :-

A] प्राथमिक समूह :- Primary Group

ज्या समूहातील सदस्यांचे संबंध अत्यंत घनिष्ठ आत्मीयतेचे

सहकार्यावर आधारित असतात. आणि ज्यांच्यात परस्पर सानिध्य मुळे सतत संपर्क असतो अशा आकाराने लहान असणाऱ्या समूहांना सी. एच. कुले यांनी प्राथमिक समूह असे म्हटले आहे
उदा. कुटुंब, लहान खेडेगाव, मित्रांचा समूह इ.

B] दुय्यम समूह :- Secondary Group

प्राथमिक समूहाच्या विरोधी लक्षणे असणाऱ्या समूहाला उत्तर समाजशास्त्रज्ञांनी 'दुय्यम समूह' असे म्हटले आहे. हेच समूह आकाराने मोठेच असतात. त्यांच्यातील संबंध घनिष्ठ स्वरूपाचे नसतात. तर ते औपचारिक व व्यक्तीनिरपेक्ष स्वरूपाचे असतात. उदा. नोकरशाही संघटना, कामगार संघटना इ.

वरील काही निकषांच्या आधारे सामाजिक समूहाचे विभिन्न प्रकारामध्ये वर्गीकरण केले जाते.

C] प्राथमिक समूह आणि दुय्यम समूह :-
Primary And Secondary Groups

प्रस्तावना :-

सामाजिक समूहाच्या वर्गीकरणाचा विचार करताना असे निदर्शनास येते की समूहातील सदस्यांमधील परस्परांशी असणाऱ्या संपर्काचे स्वरूप आणि संबंधांची घनिष्टता या निकषांच्या आधारे प्राथमिक समूह आणि दुय्यम समूह या दोन प्रकारामध्ये समूहाचे वर्गीकरण केले जाते ते पु

A] प्राथमिक समूह :- Primary Groups

प्रसिद्ध अमेरिकन समाजशास्त्रज्ञ सी. एच. कुले यांनी 'सामाजिक संघटन' (Social organization) या ग्रंथामध्ये सर्वप्रथम १९०९ मध्ये प्राथमिक समूह ही संकल्पना स्पष्ट केली. त्यामुळेच या संकल्पनेचे जनक म्हणून सी. एच. कुलेंना ओळखले जाते. समूहातील सदस्यांमधील परस्पर

संबंधांचे गुणात्मक स्वरुप हा प्राथमिक समूह संकल्पनेचा मुख्य गाभा आहे. कुटुंब, शेजारी, मित्रांचा समूह अशा प्राथमिक समूहांचा मानवी जीवनावर विशेष प्रभाव पडतो.

व्याख्या :- Definition :-

1) सी. एच. कुले :- "ज्या समूहामध्ये परस्पर संबंध अत्यंत घनिष्ट, समोरासमोरचे, दिर्घकाळ टिकणारे आणि प्रामुख्याने सहकार्यावर आधारित असतात अशा समूहाला प्राथमिक समूह म्हणून ओळखले जाते."

प्राथमिक समूह म्हणजे असा सामाजिक समूह ज्यामध्ये परस्पर सहकार्य, समोरासमोरचे संबंध, घनिष्टता इ. वैशिष्ट्ये दिसून येतात. प्राथमिक समूहातील सदस्यांमध्ये समोरासमोरचे संबंध असल्याने त्यांच्यात घनिष्टता निर्माण होते. व्यक्तीच्या समाजीकरणाची प्रक्रिया सर्वप्रथम प्राथमिक समूहामधूनच सुरु होते.
उदा. कुटुंब, शेजारी, समवयस्क मित्रांचा समूह इ.

## प्राथमिक समूहाची वैशिष्ट्ये :- Characteristics of primary Groups.

प्राथमिक समूह अस्तित्वात येण्यासाठी काही अटी आवश्यक असतात. या अटी म्हणजेच प्राथमिक समूहाची वैशिष्ट्ये होय. प्राथमिक समूहाचे स्वरुप स्पष्ट होण्यासाठी पुढील वैशिष्ट्यांचा आधार घ्यावा लागतो.

1) भौतिक सानिध्य :- समूहातील सदस्यांमध्ये भौतिक सानिध्य असणे व्यक्ती शारीरिक दृष्ट्या परस्परांच्या सानिध्यात असणे हे प्राथमिक समूहाच्या अस्तित्वासाठी आवश्यक असते. एका विशिष्ट ठिकाणी प्राथमिक समूहातील सदस्य दिर्घकाळ एकत्र राहत असल्याने त्यांच्यात घनिष्ट संबंध निर्माण होतात. केवळ भौतिक सानिध्य किंवा शरीराने जवळ असून चालत नाही. तर त्यांच्यात सतत आंतरक्रिया घडून येणे

महत्वाचे असते. या आंतरक्रिया मनापासून स्वाभाविकपणे घडणे महत्वाचे असते. भौतिक सानिध्य असल्याने सहकार्य यांसारख्या भावनिक गोष्टी निर्माण झाल्याने त्यांच्यात प्राथमिक संबंध निर्माण होतात.

2) समूहाचा लहान आकार :-

समूहाचा लहान आकार हे प्राथमिक समूहाचे वैशिष्ट्य आहे. समूहाचा आकार मर्यादित असेल तर सर्व सदस्यांमध्ये घनिष्ट संबंध निर्माण होऊ शकतात. जर आकार मोठा असेल तर एकमेकांचा परिचय होणे देखील अवघड असते. लहान आकारामुळे सदस्यांमध्ये सतत आंतरक्रिया घडून येतात. एकमेकांच्या व्यक्तिमत्वाचा परिचय होतो. त्यामुळे सहकार्याची भावना वाढीस लागून घनिष्ट संबंध निर्माण होण्यास मदत होते.

3) संबंधातील सातत्य :-

प्राथमिक समूह हे सापेक्षत: स्थिर स्वरूपाचे असतात. समूहातील सदस्यांमध्ये दिर्घकाळ आंतरक्रिया घडून येतात. त्यामुळेच प्राथमिक समूहातील सदस्यांच्या संबंधांमध्ये सातत्य आणि टिकाऊपणा येतो. त्यांच्यात भौतिक सानिध्य असते. त्यामुळे समोरासमोरचे प्रत्यक्ष संबंध निर्माण होतात. त्या संबंधांमध्ये सातत्य असते. त्यामधूनच सहकार्याची भावना निर्माण होऊन घनिष्ट संबंध निर्माण होतात. उदा. कुटुंब या प्राथमिक समूहात व्यक्ती दिर्घकाळ परस्परांच्या सानिध्यात असल्याने सदस्यांमध्ये संबंधांमध्ये सातत्य दिसून येते.

४) समोरासमोरचे संबंध :-

प्राथमिक समूहातील सदस्यांमध्ये भौतिक सानिध्य असल्याने स्वाभाविकपणे त्यांच्यात समोरासमोरचे प्रत्यक्ष संबंध निर्माण होतात. व्यक्तीगत स्वरूपाचे संबंध निर्माण होतात सततच्या आंतरक्रियांमुळे प्रत्यक्ष संबंध घडून आल्याने सहकार्य आपलेपणा इ. भावना निर्माण झालेल्या असतात. याउलट काही समूहामध्ये उदा. एखादया कार्यालयामध्ये विविध पदावर काम करणारे कर्मचारी एकाच इमारतीमध्ये असले तरी त्यांच्यात प्रत्य

समोरासमोरचा संपर्क होइलच असे नाही. त्यांचे कामकाज लिखित सूचना, टेलिफोन या माध्यमातून चालते. मात्र कुटुंबासारख्या प्राथमिक समूहात समोरासमोरचे संबंध दिसून येतात.

५) समान उद्दिष्ट्ये :- उद्दिष्टांमध्ये एकवाक्यता :-

प्राथमिक समूहातील सर्व सदस्यांच्या उद्दिष्टांमध्ये समानता, एकवाक्यता, एकसारखेपणा दिसून येतो. या समूहात प्रत्येक सदस्य वेगवेगळी उद्दिष्ट्ये मनात बाळगत नाही. समूहातील सर्व सदस्यांच्या इच्छा, आकांक्षा, अभिवृत्ती, आवडी-निवडी यामध्ये समानता दिसून येते. सर्वांना समान आशा, उद्दिष्टांसाठी त्याग करण्याची सर्वांचीच तयारी असते. त्यामुळे प्राथमिक समूहातील सदस्यांमध्ये इतर समूहातील सदस्यांमध्ये उद्दिष्टांच्या बाबतीत समानता, एकवाक्यता दिसून येते. अलिकडच्या काळात याप्रकारचे आदर्श स्वरूपाचे प्राथमिक संबंध नष्ट होत असले तरी अधिक प्रमाणात एकवाक्यता दिसून येते.

६) व्यक्ती सापेक्षता / अहस्तांतरणीय संबंध :-

प्राथमिक समूहात सदस्यांमध्ये असणारे संबंध व्यक्तीगत स्वरूपाचे असतात. प्रत्येक व्यक्तीला जे स्थान असते ते स्थान दुसरी कोणतीही व्यक्ती घेऊ शकत नाही. याचाच अर्थ या समूहातील संबंध व्यक्तीसापेक्ष अहस्तांतरणीय असतात. उदा - कुटुंबातील आईची जागा दुसरी कोणती व्यक्ती घेऊ शकत नाही.

कोणत्याही प्राथमिक समूहातील विशिष्ट गरज पूर्ण करत केवळ साधन म्हणून संबंध ठेवले जात नाहीत तर ते संबंध नि:स्वार्थी असतात. त्या संबंधांमध्ये भावनात्मक गुंतवणूक आल्याने हे संबंध अहस्तांतरणीय ठरतात. मात्र इतर समूहामध्ये अहस्तांतरणीय संबंध नसतात. उदा. एखाद्या महाविद्यालयाती प्राध्यापकांची जागा काही कारणाने दुसरी व्यक्ती घेऊ शकते. मा प्राथमिक समूहामध्ये असणारे संबंध अहस्तांतरणीय स्वरूपाचे असतात.

Scanned with CamScanner

७) स्वयंस्फूर्त संबंध :-
प्राथमिक समूहातील सदस्यांमध्ये असणारे संबंध स्वाभाविक, नैसर्गिक असतात. हे संबंध जाणीवपूर्वक, हेतूतः केले जात नाहीत तर ते सहज, स्वाभाविकपणे, अनौपचारिकपणे निर्माण झालेले असतात. सततच्या संपर्कामुळे ते निर्माण होतात. प्राथमिक समूहामध्ये व्यक्तीवर एकत्र येण्याची सक्ती नसते. उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी जाणीवपूर्वक ते संबंध ठेवत नाहीत. उदा. मैत्री घडून येते ती घडवून आणली जात नाही. याचाच अर्थ प्राथमिक समूहातील संबंध हे स्वयंस्फूर्त असतात.

८) सर्वसमावेशक संबंध :-
प्राथमिक समूहातील संबंध सर्वसमावेशक असतात. म्हणजेच व्यक्तीच्या व्यक्तिमत्वाच्या कोणत्यातरी एका भागाबद्दल ते संबंध नसतात. तर त्या संबंधात व्यक्तीचे समग्र व्यक्तिमत्व गुंतलेले असते. व्यक्तीचा स्विकार हा प्राथमिक समूहात त्याच्या सर्व गुणादोषासहित केला जातो. अशा संबंधांमध्ये व्यक्तीची मानसिक व भावनिक गुंतवणूक झालेली असते.

९) अनौपचारिक नियंत्रण :-
प्राथमिक समूहातील संबंध भावनात्मक अनौपचारिक असतात. याचा अर्थ लिखित नियम व कायदे यांच्या या संबंधांचे नियंत्रण होत नाही. परंपरेने चालत आलेल्या लोकरीति लोकनीती, या आधारे याच समूहातील संबंधांचे नियंत्रण केले जाते. प्राथमिक समूहातील सदस्यांच्या वर्तनावर नियंत्रण ठेवण्यासाठी नियम कायदे या औपचारिक साधनांऐवजी अनौपचारिक साधनांना महत्त्व दिले जाते.

१०) 'आम्ही'ची भावना :-
प्राथमिक समूह लहान असल्याने त्यांच्यात भौतिक सानिध्य असल्याने अनौपचारिक, सातत्यपूर्ण, घनिष्ठ, सर्वसमावेशक संबंध असल्याने या समूहात परस्परांच्याविषयी सहकार्य, जिव्हाळा, आदर वाटत असल्याने 'आम्ही' पणा असतो म्हणजेच सर्वजण एक असल्याची भावना दिसून येते. समूहाकडे स-

Scanned with CamScanner

व्यक्ती कोणताही त्याग करण्यास तयार असते. त्यामुळे प्राथमिक समूहामध्ये आम्ही पणाची भावना दिसून येते.

वरीलप्रमाणे सी. एच. कुले यांनी स्पष्ट केलेल्या प्राथमिक समूहामध्ये वैशिष्ट्ये दिसून येतात.

Scanned with CamScanner

## B] दुय्यम समूह :- Secondary Groups.

प्रस्तावना :-

सी. एच. कुले यांनी प्राथमिक समूहाची संकल्पना स्पष्ट केली. प्राथमिक समूहांच्या वैशिष्ट्यांच्या विरोधी वैशिष्ट्ये कमी-अधिक प्रमाणात ज्या समूहात दिसून येतात. अशा समूहाला दुय्यम समूह म्हणून ओळखले जाते. उदा. कामगार संघटना, नोकरशाही, व्यापारी संघटना इ.

व्याख्या :- Definition

1) ऑगबर्न आणि निमकॉफ :-

"जो समूह घनिष्ठतेचा अभाव असलेले अनुभव प्रदान करतो त्यास दुय्यम समूह असे म्हटले जाते."

2) हॉर्टन आणि हंट :-

"दुय्यम समूहातील सामाजिक संपर्क हे व्यक्ती निरपेक्ष खंडीत व उपयुक्ततावादी असतात."

प्राथमिक समूहाच्या वैशिष्ट्यांचा अभाव असलेला समूह घनिष्ठ संबंधांचा अभाव असणारा, औपचारिक संबंध असलेला, आकाराने मोठा असणारा समूह म्हणजे दुय्यम समूह होय.

Scanned with CamScanner

## दुय्यम समूहाची वैशिष्ट्ये :-

१) स सदस्यांमधील सामाजिक संपर्काचे स्वरूप आणि संबंधा घनिष्ठता या निकषाच्या आधारे प्राथमिक समूहाच्या परस्परविरोधी असणाऱ्या दुय्यम समूहाची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे :-

१) **विशाल आकार :-** विशाल किंवा मोठा आकार हे दुय्यम समूहाचे महत्वाचे वैशिष्ट्य आहे. दुय्यम समूहामध्ये सदस्य संख्या जास्त असल्याने या समूहाचा आकार मोठा असतो. या समूहामध्ये सदस्यांच्या संख्येवर कोणत्याही प्रकारचे नियंत्रण नसते त्यामुळे दुय्यम समूह हे आकाराने मोठे असतात. उदा. कामगार संघटना एखादे राष्ट्र इ.

२) **घनिष्ठ संबंधांचा अभाव :-** दुय्यम समूहाची सदस्य संख्या जास्त असल्याने या समूहातील सदस्य व्यापक प्रदेशात विखुरलेले असतात त्यामुळे त्यांच्यात भौतिक सानिध्य दिसून येत नाही. भौतिक सानिध्याच्या अभावामुळे त्यांच्यात घनिष्ठ संबंध निर्माण होत नाहीत. त्यांचे संबंध केवळ उद्दिष्ट पूर्ततेसाठी निर्माण होत असल्याने घनिष्ठ संबंधांचा अभाव त्याठिकाणी दिसून येतो.

३) **ऐच्छिक सदस्यत्व :-** प्राथमिक समूहाचे सदस्यत्व हे अनिवार्य असते ते व्यक्तीच्या इच्छेवर अवलंबून नसते. परंतु दुय्यम समूहाचे सदस्यत्व अनिवार्य, सक्तीचे नसते. या समूहाचा सदस्य व्हायचे की नाही हे व्यक्तीच्या इच्छेवर अवलंबून असते. उदा. एखाद्या संघटनेचे सदस्य व्हायचे की नाही हे त्या व्यक्तीवर अवलंबून असते.

४) **औपचारिक संबंध :-** दुय्यम समूहातील सदस्याचे संबंध औपचारिक स्वरूपाचे असतात. कारण या समूहातील सदस्यांमधील परस्पर संबंध विशिष्ट नियम, कायदे यानुसार नियंत्रि...

नियंत्रण करावे लागते. त्यामुळे दुय्यम समूहातील संबंधांना औपचारिक करारात्मक स्वरूप प्राप्त होते.

५) उद्देशांमध्ये भिन्नता :-

दुय्यम समूहातील सदस्यांचे उद्देश हे कधीच एकसारखे असत नाहीत. त्यांच्या हेतू व उद्देशांमध्ये भिन्नता दिसून येते. कारण दुय्यम समूहाच्या सदस्यांच्या सामाजिक आणि कौटुंबिक पार्श्वभूमीमध्ये फरक असतो. भावनात्मक एकतेचा अभाव असतो. त्यामुळेच उद्दिष्टांमध्ये एकवाक्यता नसते.

६) व्यक्ती निरपेक्ष संबंध :-

दुय्यम समूहामध्ये एखादी व्यक्ती म्हणून व्यक्तीचा विचार न करता ती व्यक्ती म्हणजे विशिष्ट भूमिका पार पाडणारी व्यक्ती म्हणून तिच्याकडे पाहिले जाते. त्यावेळी त्या व्यक्तीशी संबंधित असणारे काम पूर्ण झाल्यानंतर त्या व्यक्तीशी संबंध राहत नाही. अशा प्रकारचे व्यक्ती निरपेक्ष संबंध दुय्यम समूहात अधिक दिसून येतात.

७) हस्तांतरणीय संबंध :-

दुय्यम समूहातील व्यक्तींचे संबंध व्यक्ती निरपेक्ष असल्याने ते हस्तांतरणीय असतात. म्हणजेच एक व्यक्ती दुसऱ्या व्यक्तीची जागा अगदी सहजपणे घेऊ शकते. उदा. एखादे कामगार काम सोडून गेल्यास त्याठिकाणी दुसरा कामगार नेमला जातो. हस्तांतरणीय स्वरूपाचे संबंध दुय्यम समूहामध्ये दिसून येतात.

८) साधन स्वरूप संबंध :-

प्राथमिक समूहातील संबंध अनौपचारिकपणे निर्माण होत असतात. परंतु दुय्यम समूहातील सदस्यांचे संबंध हे साधनमात्र असतात. विशिष्ट हेतू किंवा उद्दिष्ट पूर्ण करण्याच्या दृष्टीने दुय्यम समूहाची निर्मिती झालेली असते. या समूहातील सदस्य केवळ आपले उद्दिष्ट किंवा स्वार्थ पूर्ण करण्यासाठीच प्रयत्न करतात.

Scanned with CamScanner

९) औपचारिक नियंत्रण :-

दुय्यम समूहातील सदस्यांचे संबंध परंपरागत, लोकरीतीच्या सहाय्याने नियंत्रित होत नाही. सदस्यांचे विविधता असल्याने त्यांच्यावर कायदा, नियम, इ. औपचारिक साधनांद्वारे वर्तनावर नियंत्रण ठेवले जाते. म्हणजेच दुय्यम समूहातील नियंत्रण औपचारिक स्वरूपाचे असते.

१०) संपर्क साधनांचा वापर :-

प्राथमिक समूहात सदस्य संख्या मर्यादित असल्याने भौतिक सानिध्य असल्याने त्यांच्यात प्रत्यक्ष संबंध असतात. परंतु दुय्यम समूहातील सदस्य संख्या जास्त असल्याने परस्परांशी संपर्क साधण्यासाठी संपर्क साधनांचा वापर केला जातो. उदा. एखादी कामगार संघटना, राजकीय पक्ष आपल्या मासिकाच्या सहाय्याने संपर्क साधतात.

११) दुय्यम समूहामध्ये मर्यादित स्वरूपाचे संबंध असतात.

१२) दुय्यम समूहातील सदस्यांमध्ये भौतिक सानिध्याची गरज भासत नाही.

१३) व्यक्तीमत्वाच्या विशिष्ट भागावरतीच दुय्यम समूहामुळे परिणाम होतात.

समूहातील व्यक्तींच्या परस्पर संबंधांवरून प्राथमिक व दुय्यम समूह हे वर्गीकरण केले जाते. दुय्यम समूहामध्ये व्यक्ती निरपेक्ष, हस्तांतरणीय, औपचारिक संबंधांना अधिक महत्त्व दिले जाते. व्यक्तीपेक्षा व्यक्तीच्या दर्जाला अधिक महत्त्व दिले जाते.